## साईभक्तांना विनम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत आज सोमवार दिनांक १० नोव्हेंबर,२०२५ रोजी श्री साईबाबा संस्थानचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे व मुख्य लेखाधिकारी श्रीमती मंगला वराडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचे शुभहस्ते संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका -२०२६ प्रकाशित करणेत आलेल्या आहेत.

यामध्ये श्री साई दैनंदिनी मोठी (०४ प्रादेशिक भाषेत असून यात मराठी/इंग्रजी, हिंदी/इंग्रजी, तेलुगू/इंग्रजी, तामिळ/इंग्रजी आणि श्री साईबाबा दैनंदिनी लहान ) तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका (३ प्रकारचे वॉल कॅलेंडर व २ प्रकारचे टेबल कॅलेंडर) छपाई करण्यात आली असुन सन-२०२६ ची श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका ही विशेष डिझाईनमध्ये बनविलेली आहे. या दैनंदिनीचे वैशिष्टये म्हणजे यामध्ये असलेले क्युआर कोडमध्ये मंदीर तसेच संस्थान चालवत असलेल्या विविध उपक्रमांचे व्हिडिओ आपणांस पाहवयास मिळतील.

श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका बाबतची छपाई संख्या व विक्री मुल्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Shree Saibaba **Diary** 2026 (Big Size) | Shree Saibaba Small Diary | 1 Page Calendar (Big size) | Wall Calendar Office (6 Sheets) | Desk Calendar (7 Sheets) | Car Calendar (7 Sheets) | Small Desk Calendar (month/date) (185 Sheets) | Deluxe Wall Calendar (8 Sheets) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **₹90** | **₹15** | **₹20** | **₹20** | **₹40** | **₹5** | **₹75** | **₹210** |

तरी सर्व साईभक्तांना विनम्र आवाहन करण्यात येते की, वरील संस्थान प्रकाशने साईभक्तांसाठी १० नोव्हेंबर,२०२५ पासुन संस्थानचे मंदीर परिसरातील पुस्तके विक्री केंद्रावर विक्रीकामी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

ज्या साईभक्तांना श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका खरेदी करावयाच्या आहेत, त्यांनी संस्थानच्या संकेतस्थळावर (online.sai.org.in) नोंदणी करून दैनंदिनी व दिनदर्शिका-२०२६ खरेदी कामीची रक्कम (पोस्टल चार्जेसह) online.sai.org.in या संकेतस्थळद्वारे भरलेनंतर श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका पोस्टामार्फत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

संस्थान प्रकाशनांची विस्तृत माहिती संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.